मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » रविवार, दि. 17 नोव्हेंबर 2024 | पान- 1

# शंकर जगताप यांना निवडून द्या : नितीन गडकरी

## तुमच्या समस्या सोडविण्याची गॅरंटी मी देतो : नितीन गडकरी यांनी चिंचवडकरांना आवाहन केले.

**पिंपरी | प्रतिनिधी**

निवडणूक काळात जो उमेदवार तुमचं भविष्य बदलू शकतो, नशीब बदलू शकतो, तुमच्या आशा आकांक्षा पूर्ण करू शकतो, अशा उमेदवाराच्या पाठीशी तुम्ही उभे राहिलात तर तुमच्या सर्व समस्या नक्कीच मार्गी लागतील. आणि या सर्व गोष्टी पूर्णत्वास नेण्याची क्षमता शंकर जगताप यांच्या नेतृत्वात आहे. त्यामुळे या निवडणुकीत तुम्ही जगताप यांना प्रचंड मताधिक्याने विजयी करा, त्यांच्या माध्यमातून तुमचे सर्व प्रश्न, वाहतुकीच्या समस्या सोडविण्याची गॅरंटी मी देतो, अशा शब्दांत केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी चिंचवडकरांना आवाहन केले.

चिंचवड विधानसभा मतदारसंघातील भाजप - शिवसेना - राष्ट्रवादी काँग्रेस - रिपाइं (आठवले) मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार शंकर जगताप यांच्या प्रचारार्थ केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची जाहीर सभा भूमकर चौक, वाकड येथील द्रौपदा लॉन्स मंगल कार्यालय याठिकाणी संपन्न झाली. यावेळी ते बोलत होते.



### बाबासाहेबांचे संविधान कोणी बदलू शकत नाही

» लोकसभा निवडणुकीच्या वेळी काँग्रेस आणि विरोधकांनी देशात भाजपविरोधात संविधान बदलाचा फेक नरेटिव्ह पसरवला. मात्र भारतीय जनता पक्ष हा संविधानाच्या तत्वावर चालणारा पक्ष आहे. याउलट काँग्रेस पक्षानेच त्यांच्या 60 वर्षांच्या सत्ताकाळात वारंवार संविधानावर घाला घालण्याचा प्रयत्न केला. याचे उदाहरण म्हणजे पंतप्रधान इंदिरा गांधी काळात आणीबाणी लादून जनतेच्या संविधानिक हक्कांवर गदा आणण्याचे पाप काँग्रेसने केले. त्यामुळे ज्यांनी संविधान तोडण्याचे काम केले, तेच आज संविधान रक्षक असल्याचा आव आणत आहेत. त्यामुळे देशात जातीयवाद पेरणाऱ्या महाविकास आघाडीच्या या खोट्या अपप्रचाराला बळी पडू नका. कारण भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान कोणी बदलू शकत नाही आणि आम्ही ते कोणाला बदलूही देणार नाही, असे यावेळी नितीन गडकरी म्हणाले.

### काँग्रेसच्या चुकीच्या धोरणामुळे देशाचे अतोनात नुकसान

» आपल्या देशात पैशाची कमतरता नाही मात्र इमानदारीने काम करणाऱ्या नेत्यांची कमतरता आहे. याचाच दुष्परिणाम आपल्या देशाने काँग्रेस सरकारच्या 60 वर्षांच्या सत्ताकाळात भोगले. काँग्रेसने देशाचे नेतृत्व न करता देशाचे व्यापारी होण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे 'ज्या देशाचा राजा व्यापारी; त्या देशाची प्रजा भिकारी' अशी अवस्था आपल्या देशाची झाली होती. मात्र २०१४ साली देशाच्या जनतेने योग्य पक्ष, योग्य नीती आणि योग्य नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत देशात सत्तापालट केला. आणि खऱ्या अर्थाने आपल्या देशात विकासाची गंगा आली. त्यामुळे आजच्या या देशाच्या विकासाचे संपूर्ण श्रेय हे देशातील सर्व जनतेला आहे, असेही गडकरी यावेळी म्हणाले.

" चिंचवड विधानसभा मतदारसंघाची ओळख ही विकसनशील मतदारसंघ म्हणून आहे. 2009 पासून या मतदारसंघात मोठ्या प्रमाणात शहरीकरण आणि औद्योगिकरण झाले. या वाढत्या लोकसंख्येमुळे या मतदारसंघात मूलभूत सोयी सुविधा उपलब्ध करताना मोठ्या प्रमाणात अडचणींचा सामना करावा लागला. मात्र स्व. लक्ष्मणभाऊंनी केंद्र शासन, राज्यातील महायुती सरकार आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील भाजपच्या माध्यमातून या प्रभागात अनेक विकासकामे करून या समस्या सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केला. वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी उड्डाणपूल, ग्रेड सेपरेटर यांसह रस्त्यांचे जाळे निर्माण करण्याचे काम मोठ्या प्रमाणावर केले. यापुढील काळात मतदारसंघातील पाणी, वाहतूक कोंडी, प्रदूषण या काही प्रमुख समस्या केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून मार्गी लावून आपला चिंचवड विधानसभा मतदारसंघ विकसित मतदारसंघ म्हणून नावारूपास आणण्याचे काम मी करणार आहे.

- शंकर जगताप, उमेदवार, महायुती.

---

# आमदार अण्णा बनसोडे यांच्या प्रचाराचा झंझावात

## आमदार अण्णा बनसोडे यांनी मोहननगर, काळभोरनगर परिसरात पदयात्रा काढली.

**पिंपरी | प्रतिनिधी**

. पिंपरी विधानसभा मतदारसंघात महायुतीचे उमेदवार आमदार अण्णा बनसोडे यांना सर्व स्तरातून पाठिंबा वाढत आहे. त्यामुळे आता आमदार अण्णा बनसोडे यांना विक्रमी मताधिक्य मिळणार असल्याची खात्री महायुतीच्या घटक पक्षातील पदाधिकारी व्यक्त करीत आहेत.

खासदार श्रीरंग बारणे हे देखील मोहननगर येथे पदयात्रेत सहभागी झाले. खासदार श्रीरंग बारणे यांनी आमदार अण्णा बनसोडे यांच्या विजयाची खात्री दिली. यावेळी आमदार अमित गोरखे, आमदार उमा खापरे, सदाशिव खाडे, नारायण बहिरवडे, चंद्रकांता सोनकांबळे, निलेश तरस, राजू दुर्गे, राजेश पिल्ले, मेहुल भरतदोशी, सतीश काळभोर, सुजाता पालांडे, वैशाली खामकर, तेजस्विनी कदम, अनुराधा गोरखे, शर्मिला बाबर, शैलजा मोरे, मोहिनी टेकवडे, किरण देशमुख, कैलास कुटे, संजय जगताप, गणेश लंगोटे, वैशाली काळभोर, आयुष निंबाळकर, मनीषा शिंदे, तेजस्विनी दुर्गे, रेखा काडाणी, सुप्रिया चांदगुडे, शैला मोळक, संगीता लोखंडे, मोनिका कुटे, निर्मला माने, अकबर मुल्ला, गणेश लंगोटे, महादू नेर्लेकर, गिरीश गीते, रामा बहिरवडे, पृथ्वीराज देशमुख, विकी बारुट, शशिकांत पाडाळे, सतीश दरेकर, प्रकाश सोमवंशी, सुनील सूर्यवंशी, प्रकाश गायकवाड, आदित्य राठोड, नागेश वाघमोडे, अमोल गवळी, विजय मिसाळ, शीला भोंडवे आदी उपस्थित होते.



मोहननगर येथील छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशद्वार येथून पदयात्रेला सुरुवात झाली. पदयात्रा पुढे महावीर पार्क, बाबर गार्डन, गाय वासरू चौक, लोखंडे दवाखाना, दत्त मंदिर, अलंकार कॉर्नर, फुलेनगर, शंकर मंदिर कॉर्नर, तुळजाभवानी माता मंदिर, मनपा शाळा, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, शिवदर्शन कॉलनी, कलावती माता मंदिर, वहिले चाळ, संतोषी माता मंदिर, काळभोर नगर या परिसरातून काढण्यात आली.

आमदार अण्णा बनसोडे यांचा वैयक्तिक जनसंपर्क मोठा आहे. त्यात आता महायुतीची ताकद त्यांच्या पाठीशी आहे. पिंपरी विधानसभेसाठी इच्छुक असलेल्या बहुतांश उमेदवारांनी माघार घेत आमदार बनसोडे यांना पाठिंबा दिला आहे. त्यात शहराच्या विविध भागात काढलेल्या पदयात्रेला दिवसेंदिवस अतिशय मोठा प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे आमदार अण्णा बनसोडे यांचा विजय निश्चित असून मताधिक्य मोठी वाढ होणार असा विश्वास पदाधिकारी व्यक्त करीत आहेत.

# थेरगावकरांचा निर्धार राहुलदादांना करणार आमदार..!

## राहुल कलाटेंच्या पदयात्रेला उस्फुर्त प्रतिसाद

**पिंपरी | प्रतिनिधी**

थेरगावकर ग्रामस्थ महाविकास आघाडीचे उमेदवार राहुल कलाटे यांच्या खंबीरपणे पाठीशी उभे राहिल्याचा प्रत्येय थेरगावातील परिवर्तन पदयात्रेत आला. या पदयात्रेत अबाल वृद्ध नागरिक महिला आणी युवकांनी रेकॉर्ड ब्रेक गर्दी केली होती. थेरगाव परिसरात कलाटे यांचे आगमन होताच हलगी तुतारीच्या कडाडणाऱ्या आवाजात, फटाक्यांची आतिषबाजी अन जागोजागी फुलांची पुष्पवृष्टी करत जोरदार स्वागत करण्यात आले. यंदा आमचं ठरलंय - वार फिरलंय, परिवर्तन घडणारच, राहुल दादा आमदार होणारच या घोषणांनी थेरगाव परिसर अक्षरशः दुमदमली.



राहुल कलाटे यांच्या प्रचारार्थ थेरगाव गणेश नगर मधील गणपती मंदिर, परिसरातील सर्व कॉलनी, पडवळ नगर, गुजर नगर, सोळा नंबर परिसर, अशोका सोसायटी, कैलास मंगल कार्यालय, धनगर बाबा मंदिर, तापकीर चौक, बारणे चौक, पदमजी पेपर मिल, दत्तनगर पूर्ण परिसरात परिवर्तन पद यात्रा काढण्यात आली. यावेळी, अनेक वर्ष या परिसरात प्रलंबित असलेल्या समस्यांचे गाऱ्हाणे नागरिकांनी मांडले. थेरगावकर जनतेला आता बदल हवा असून, यंदा विकासाचा नवा आश्वासक चेहरा आम्हाला हवा असल्याने यावेळेस थेरगावकर राहुल कलाटे यांना प्रचंड मताधिक्याने विजयी करणार अशी ग्वाही दिली.

यावेळी राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष

सुनील गव्हाणे, माजी नगरसेवक संपत पवार, मनोहर पवार, विशाल बारणे, विशाल पवार, संभाजी बारणे, शरद गुजर, नितीन पाडाळे, निखील गुजर, अमित गुजर, गणेश गुजर, दीपक तरडे, महेश बारणे, विनय बारणे, शरद बारणे, बबलू चांदणे, सुरेश गुजर, प्रकाश गुजर, विठ्ठल गुजर, दत्ता पोटे यांच्यासह महाविकास आघाडीचे कार्यकर्ते, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पूरस्थिती अहवालाला आचारसंहितेची आडकाठी

## निवडणूक आचारसंहितेची कोणतीही आडकाठी नसल्याचे जिल्हाधिकारी तसेच राज्य निवडणूक अधिकाऱ्यांनी पुणे महापालिकेला कळवले आहे

**पुणे | प्रतिनिधी**

पूरस्थितीबाबातचा अहवाल प्रसिद्ध करण्यात निवडणूक आचारसंहितेची कोणतीही आडकाठी नसल्याचे जिल्हाधिकारी तसेच राज्य निवडणूक अधिकाऱ्यांनी पुणे महापालिकेला कळवले आहे.

जुलै महिन्यात खडकवासला धरणातून पाण्याचा विसर्ग केल्यानंतर सिंहगड रस्ता परिसरासह शहरात पूरस्थिती निर्माण झाली होती. या पूरस्थितीचे कारण शोधण्यासाठी पुणे महापालिकेने समिती नेमली होती. समितीने आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांच्याकडे अहवाल सादर केला आहे. मात्र त्या अहवालाच्या प्रति विधानसभा निवडणूकीच्या आचारसंहितेचे कारण देत प्रसिद्ध केल्या नव्हत्या. तसेच कोणतीही कार्यावही केलेली नाही. त्यामुळे पुणेकरांनी संताप व्यक्त केला होता. पूरस्थिती अहवालाला आचारसंहितेची आडकाठी खरंच आहे का, यासाठी सजग नागरिक मंचचे अध्यक्ष विवेक वेलणकर यांनी राज्य निवडणूक अधिकारी आणि जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठपुरावा केला असता, अहवाल प्रसिद्ध केल्याने आचारसंहितेचा भंग होत नसल्याचे स्पष्ट करण्यात आले. त्यामुळे आता तरी आयुक्त अहवाल सादर करणार की नवे कारण शोधणार, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

माथ्यावर पावसाने दमदार हजेरी लावल्याने खडकवासला धरण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात पाण्याचा साठा वाढल्याने धरणातून विसर्ग सोडण्यात आला होता. धरणातून पाणी सोडल्यानंतर सिंहगड रस्ता परिसरासह इतर भागात पूर परिस्थिती निर्माण झाली होती. त्याचा नागरिकांना चांगलाच त्रास सहन करावा लागला. प्रत्येक वेळी धरणातून पाणी सोडल्यानंतर अशीच परिस्थिती निर्माण होणार का, असा प्रश्न पुणेकरांकडून उपस्थित केला जात आहे. त्यामुळे पुण्यात पूर परिस्थिती झाल्यानंतर राजकीय वातावरण चांगलेच तापले होते.

दरम्यान, सजग नागरिक मंचने पूरस्थिती संदर्भातील अहवालाची प्रत दिल्याने खरंच आचारसंहितेचा भंग होतो का, याबाबतची विचारणा राज्य निवडणूक अधिकारी तसेच पुण्याचे निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांच्याकडे केली होती. त्याबाबतचे पत्रही देण्यात आले होते. त्यावर अहवालाच्या प्रती दिल्यामुळे निवडणूक आचारसंहितेचा भंग होत नाही, असे त्यांनी महापालिकेला कळवले असल्याचे वेलणकर यांनी 'सीविक मिरर'ला सांगितले. याबाबत संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र, संपर्क होऊ शकला नाही.



### भूमिकेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते

» समितीने सादर केलेला अहवाल जनतेसाठी खुला करण्याची मागणी सजग नागरिक मंचने केली होती. अहवालावर चर्चा केल्यानंतर तो जनतेसाठी खुला केला जाईल. असे आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी सांगितले होते. परंतु त्यानंतर आयुक्तांनी यू टर्न घेतला आणि धोरणात्मक चौकशी समिती नव्हती, असे सांगत अहवाल जाहीर केला जाणार नाही, असे स्पष्ट केले होते. आयुक्तांनी घेतलेल्या भूमिकेचा सजग नागरिक मंचसह जागरूक पुणेकरांनी निषेध केला होता. तसेच आयुक्त हे सनदी नोकर आहेत, महापालिकेचे मालक नाहीत, असे सांगत अहवाल जाहीर करण्याची पुन्हा एकदा मागणी केली होती. त्यावर आयुक्तांनी अहवालाच्या प्रति वाचण्यास उपलब्ध करुन दिल्या होत्या. परंतु प्रत्यक्ष प्रती देण्यास आचारसंहितेचे कारण देत नकार दिला होता. यामुळे त्यांच्या भूमिकेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते.

> “ महापालिका आयुक्तांच्या निर्देशाप्रमाणे सोमवारच्या माहिती अधिकारदिनी अवलोकन केलेल्या कागदपत्रांच्या प्रती त्यासाठीचे शुल्क भरून घेवून त्वरित देणे आवश्यक आहे. हे निदर्शनास आणून दिले. तसेच यासंदर्भातील पत्र दिले आणि या अहवालाच्या प्रतीची मागणी केली. आठवडाभर पाठपुरावा केल्यानंतर निवडणूक आचारसंहितेचं कारण दाखवून प्रत देणे नाकारले होते. याबाबत आम्ही राज्य निवडणूक अधिकारी चोक्कलिंगम यांच्याशी चर्चा केल. त्यांनी पुणे निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांच्याशी चर्चा केली. दिवसे यांनी हा अहवाल उपलब्ध करुन देण्यासाठी निवडणूक आचारसंहितेची आडकाठी नाही, असे सांगितले आहे. त्याआधारे आम्ही महापालिका आयुक्तांकडे अहवालाच्या प्रतीची मागणी केली आहे. त्यांनी ती उपलब्ध करून द्यावी.
>
> **- विवेक वेलणकर , अध्यक्ष, सजग नागरिक मंच, पुणे**

# भाजपा महायुती सरकार आल्यास विकासाला नवी दिशा मिळेल :मुख्यमंत्री भजनलाल शर्मा

## राजस्थानवासी भाजपच्या नेहमीच पाठीशी, महेश लांडगे यांची हॅट्रिक होणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

भाजपा महायुती सरकारने राजस्थानमध्ये जाहीरनाम्यातील 50 टक्के आश्वासने 11 महिन्यांत पूर्ण केली आहेत. महाराष्ट्रातही भाजप महायुतीचे सरकार आल्यास विकासाला नवी दिशा मिळेल आणि राज्यातील विकासाचा वेग वाढले, असा विश्वास राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांनी व्यक्त केला. पिंपरी चिंचवडच्या औद्योगिक नगरीच्या विकासासाठी भाजपचे शिलेदार विधिमंडळात जाणे आवश्यक आहे. त्यासाठी भोसरी मतदारसंघातून महेश लांडगे यांना प्रचंड मतांनी विजयी करत त्यांची हॅट्रिक पूर्ण करा असे आवाहन देखील त्यांनी राजस्थानी बांधवांना केले.



राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांनी महायुतीचे भोसरी विधानसभा मतदारसंघाचे अधिकृत उमेदवार महेश लांडगे यांच्यासोबत नागरिकांशी संवाद साधण्यात आला. यावेळी भजनलाल शर्मा यांनी दि. 20 नोव्हेंबर रोजी आमदार महेश लांडगे यांना प्रचंड बहुमतांनी विजयी करण्याचे आवाहन राजस्थानी बांधवांना केले. यावेळी प्रभारी प्रदीपसिंह जडेजा, विस्तारक दीपक रजपूत, समन्वयक विजय फुगे आदी उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करताना, मुख्यमंत्री शर्मा म्हणाले, “मोदींच्या नेतृत्वाखाली भारत संपूर्ण जगात एक शक्ती म्हणून उदयास येत आहे”. गरीब कल्याणकारी योजना, सीमा सुरक्षा, दहशतवादाशी सामना आणि भारताची आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रतिष्ठा वाढवण्यासाठी मोदी सरकारने केलेल्या कामाचे उल्लेख सर्व स्तरीय कौतुक होत आहे.

काँग्रेसवर निशाणा साधताना मुख्यमंत्री शर्मा म्हणाले, “राजस्थानमध्ये काँग्रेसच्या राजवटीत तरुणांची फक्त फसवणूक होत होती. भाजप सरकार येताच आम्ही पेपर लीक प्रकरणांच्या तपासासाठी एसआयटीची स्थापना केली. गुंड आणि माफियांचा नायनाट करण्यासाठी अँटी गँगस्टर टास्क फोर्सची स्थापना केली”. भाजपा सरकारने राजस्थानमधील जाहीरनाम्यातील 50 टक्के आश्वासने 11 महिन्यांत पूर्ण केली आहेत. महाराष्ट्रातही भाजप महायुतीचे ट्रिपल इंजिन सरकार आल्यास विकासाला नवी दिशा मिळेल आणि राज्यातील विकासाचा वेग वाढले, असा विश्वास शर्मा यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री शर्मा यांनी राजस्थानी समाजाची भूमिका आणि त्यांच्या राष्ट्रप्रेमाविषयी अभिमान असल्याचे सांगितले. प्रत्येक राजस्थानी बांधवांना राष्ट्रवाद हा सर्वोच्च आहे. राष्ट्रासाठी हा समाज नेहमीच समर्पित असतो. महाराष्ट्र आणि राजस्थान दोन्ही स्वाभिमानाच्या भूमी आहेत. जिथे महाराणा प्रताप, छत्रपती शिवाजी महाराज यांसारखे महान योद्धे जन्माला आले, असे म्हटले. राजस्थानी समाज नेहमीच भाजपच्या पाठीशी राहिलेला आहे त्यामुळे आमदार महेश लांडगे यांना राजस्थानी बांधव बहुमतांनी विजयी करतील असा विश्वास देखील भजनलाल शर्मा यांनी व्यक्त केला.

# मुदत ठेवीची रक्कम व्याजासह परत करा; ग्राहक आयोगाचे आदेश

## सॉइल प्रॉपर्टीज् ॲण्ड इन्फ्रा इंडिया या कंपनीसह तिच्या तीन संचालकांना पुणे जिल्हा ग्राहक आयोगाचा दणका

**पुणे | प्रतिनिधी**

मुदतठेव परिपक्व झाल्यानंतरही गुंतवलेली रक्कम तसेच व्याज देण्यास टाळाटाळ करणाऱ्या सॉइल प्रॉपर्टीज् ॲण्ड इन्फ्रा इंडिया या कंपनीसह तिच्या तीन संचालकांना पुणे जिल्हा ग्राहक आयोगाने दणका दिला आहे.



ठेव परिपक्व झाल्याच्या तारखेपासून आदेशाच्या तारखेपर्यंत पाच टक्के व्याज दराने देण्यात यावेत. याखेरीज, मानसिक त्रासापोटी दहा हजार रुपये तसेच तक्रार अर्जाच्या खर्च म्हणून सात हजार रुपये 45 दिवसांच्या आत देण्याचे आदेश ग्राहक आयोगाने दिले. ही सेवेतील त्रुटी असल्याचा निष्कर्ष काढत अध्यक्ष अनिल जवळेकर, सदस्या शुभांगी दुनाखे व सदस्या सरीता पाटील यांनी हा आदेश दिला आहे.

तक्रारदार हे चिखली येथील रहिवासी असून ज्येष्ठ नागरिक आहेत. त्याच्या वतीने ॲड. ज्ञानराज संत यांनी ग्राहक आयोगात बाजू मांडली. जानेवारी 2013 ते डिसेंबर 2018 दरम्यान स्व-कष्टाच्या कमाईमधील एक हजार रुपये ते दर महिन्याला सॉईल प्रॉपर्टीज् ॲण्ड इन्फ्रा इंडियाच्या आवर्ती ठेव खात्यात जमा करत होते. कंपनीने खाते परिपक्व झाल्यानंतर 97 हजार देण्याचे कबूल केले. त्यानंतर कंपनीने त्यांना आणखी एक ऑफर सांगितली.

तक्रारदार यांनी कंपनीवर विश्वास ठेऊन ऑक्टोंबर 2017 मध्ये खाते परिपक्व झाल्यानंतर त्यातील 97 हजार रुपये तीन वर्षांकरीता मुदत ठेव म्हणून ठेवले. यावेळी, कंपनीने जानेवारी 2021 पर्यंत 1 लाख 94 हजार रुपये देण्याचे कबूल करत पावती दिली. ठेव परिपक्व झाल्यानंतर त्यांनी कंपनीकडे पैशांची मागणी केली.

मात्र, कंपनीकडून ती देण्यास टाळाटाळ करण्यात आली. त्यानंतर, त्यांनी कंपनीसह तीन संचालकांना कायदेशीर नोटीस पाठविली. मात्र त्यास कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने आयोगात धाव घेतली होती. आयोगातही ते हजर राहिले नाहीत. त्यामुळे तक्रारदारांच्या युक्तीवादानंतर आयोगाने निकाल दिला.

# कामगारांच्या हिताचा विचार; म्हणून महेशदादांसोबत!

## शहरातील विविध कामगार संघटनांचा निर्धार : एकजुटीने आमदारांची हॅट्रिक साधणार



**पिंपरी | प्रतिनिधी**

प्रस्थापित यंत्रणा डोंगरासारख्या असतात. आपण त्यांना कितीही धडका मारल्या तरी या यंत्रणा हलत नाहीत. म्हणून आमदार महेश लांडगे यांच्यासारखा भक्कम पाठींबा आपल्या कामगारांच्या पाठीशी असणे महत्वाचे आहे. आमदार महेश लांडगे यांनी गेल्या दहा वर्षात कामगारांना न्याय मिळवून देण्याचे काम केले आहे. कामगार एकजुटीतून आमदार महेश लांडगे यांच्या हॅट्रिकची संधी आपण त्यांना मिळून देणार असल्याचा निर्धार कामगार संघटनांच्या मेळाव्यात करण्यात आला.

साधूराम गार्डन, मंगल कार्यालय मोशी येथे पार पडलेल्या भोसरी मतदार संघातील संघटीत व असंघटीत कामगार बांधवांनी आमदार महेश लांडगे यांना एकमुखी पाठिंबा जाहीर केला आहे.

कामगारांनी यावेळी आपल्या भावना व्यक्त केल्या. संघटित, असंघटित क्षेत्रामध्ये काम करताना कामगारांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. गेल्या अनेक वर्षात कामगार क्षेत्रामध्ये प्रस्थापित यंत्रणांनी कामगार विषयक भूमिकांचे धोरण तकलादू ठेवले आहे. भाजपचे शासन आल्यानंतर कामगारांचा, कामगार धोरणांचा विचार सुरू झाला. मोदी सरकारने अकुशल कामगारांपासून, स्थानिक पातळीवर काम करणाऱ्या घटकांचा विचार केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विश्वकर्मा योजना आणली यातून कौशल्य विकास करण्याबरोबरच स्टायपेंड देणे सुद्धा सुरू केले.

असंघटीत कामगारांसाठी प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजनेचा शुभारंभ झाला असून या योजनेमध्ये बांधकाम कामगार, घरेलू कामगार, माथाडी कामगार, सुरक्षारक्षक अशा सर्वांना वयाची ६० वर्ष पूर्ण झाल्यानंतर दरमहा ३ हजार रुपये पेन्शन मिळणार आहे. कामगारांच्या सर्व स्तरीय बाजूंचा विचार करणारे सरकार आपल्याला हवे आहे त्यामुळे महायुतीचे उमेदवार विधिमंडळात असणे गरजेचे आहे त्यासाठीच आपल्याला महेश लांडगे यांना पाठिंबा द्यायचा आहे, असा संकल्पही कामगारांनी केला आहे.

> भाजप, शिवसेना महायुतीची धोरणे ही कामगारांना पूरक अशी आहेत .कामगारांसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारने अनेक योजना राबवल्या आहेत .कौशल्य विकास उपक्रम राबवत असंगठीत कामगारांनाही मुख्य प्रवाहात आणण्याचे काम भाषण शासनाने केले आहे. त्यामुळे प्रत्येक कामगारांना न्यायची भूमिका ठेवणाऱ्या भाजप व आमदार महेश लांडगे यांना कामगारांच्या एकजुटीतून आपल्याला पुन्हा एकदा विधिमंडळात पोहोचवायचे आहे. भोसरी मतदारसंघातून आमदार महेश लांडगे यांची हॅट्रिक आम्ही कामगारांनी पक्की केली आहे. येत्या 20 नोव्हेंबर रोजी पूर्ण ताकदीने महेश लांडगे यांना मतदान करण्याचे आवाहन प्रत्येक कामगार करणार आहे . तर आम्हा कामगारांना महेश लांडगे यांनी पुढची पाच वर्ष कामगारांसाठी देणार असल्याचा विश्वास देखील दाखवला आहे यातून महेश लांडगे यांची हॅट्रिक नक्की आहे.
>
> **- इरफान सय्यद, उपनेते, शिवसेना.**

# अजित गव्हाणेंसाठी महाविकास आघाडीचा जोरदार प्रचार!

## मिशन विधानसभा : शेवटच्या टप्प्यात अजित गव्हाणे यांना वाढता पाठिंबा



**पिंपरी | प्रतिनिधी**

मूलभूत प्रश्नांची सोडवणूक होण्यासाठी महापालिकेकडे पाठपुरावा, शांतता, महिलांना सुरक्षा या मुद्द्यावर चक्रपाणी वसाहत, लांडगे वस्ती, राधाकृष्ण नगर तसेच चक्रपाणी वसाहतीतील नागरिकांनी महाविकास आघाडीचे उमेदवार अजित गव्हाणे यांना जास्तीत जास्त लीड देऊन विजयी करणार असल्याचे सांगितले. दरम्यान निवडणूक येत्या 20 नोव्हेंबर रोजी होणार असून शेवटच्या टप्प्यात महाविकास आघाडीचे उमेदवार अजित गव्हाणे यांना जोरदार पाठिंबा मिळत आहे. यामुळे कार्यकर्त्यांचे मनोबल प्रचंड वाढले असून , राम कृष्ण हरी वाजवा तुतारी असा एकच जयघोष पाहायला मिळत आहे.

महाविकास आघाडी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे भोसरी विधानसभा मतदारसंघातील अधिकृत उमेदवार अजित गव्हाणे यांच्या प्रचारार्थ शुक्रवारी राधाकृष्ण नगर, चक्रपाणि वसाहत, महादेव नगर तसेच लांडगे वस्ती परिसरामध्ये नागरिकांच्या गाठीभेटी घेण्यात आल्या यादरम्यान पदयात्रा काढण्यात आली. नागरिकांशी संवाद साधत अजित गव्हाणे यांनी आगामी काळात नागरिकांना या परिसरात शांतता आणि सलोख्याचे वातावरण पाहायला मिळेल असे सांगितले.

दरम्यान आजच्या पदयात्रेत नुकतेच भाजपमधून महाविकास आघाडी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षात आलेल्या माजी नगरसेविका सारिका लांडगे तसेच सामाजिक कार्यकर्ते संतोष लांडगे यांनी देखील सहभाग घेतला. या भागातील दडपशाही मोडून काढण्यासाठी अजित गव्हाणे यांना भरघोस मतांनी विजयी करणार आहे असे संतोष लांडगे म्हणाले. संतोष लांडगे यांनी अजित गव्हाणे यांच्यासोबत पदयात्रेत नागरिकांशी संवाद साधला. आपले प्रश्न अजित गव्हाणे यांच्या माध्यमातून सोडवले जातील..त्यामुळे अजित गव्हाणे यांना भरघोस मतांनी विजयी करा असे आवाहन संतोष लांडगे यांनी नागरिकांना केले.

### तरुणांचा स्वयंस्फूर्तीने पदयात्रेत सहभाग

» आजच्या सभेत युवकांचा अजित गव्हाणे यांना प्रचंड पाठिंबा असल्याचे दिसून आले. अनेक तरुण स्वयं स्फूर्तीने अजित गव्हाणे यांच्यासोबत पदयात्रेत चालताना दिसत होते. यावेळी काही तरुणांना सेल्फी काढण्याचा मोह देखील आवरला नाही. तरुणांशी संवाद साधताना अजित गव्हाणे यांनी आगामी काळात आपल्या शहरातील औद्योगिक बेल्ट लक्षात घेऊन स्मॉल क्लस्टर उभारण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. याशिवाय मोशी येथील एक्झिबिशन कन्व्हेन्शन सेंटर पूर्णपणे कार्यान्वित व्हावे यासाठी पावले उचलली जातील असे देखील अजित गव्हाणे म्हणाले.

### कामगारांशी चर्चा, समस्या सोडविण्याचे आश्वासन

» अजित गव्हाणे यांनी शुक्रवारी टाटा मोटर्स कंपनीच्या बाहेर कामगारांशी संवाद साधला. कामगारांची भेट घेऊन आगामी काळात त्यांच्या समस्या सोडवण्याचे आश्वासन दिले. कामगारांनी यावेळी आपल्या भावना व्यक्त केल्या. ते म्हणाले या औद्योगिक नगरीसाठी शरद पवार यांनी केलेले काम आम्ही विसरलेलो नाही.त्यांच्या माध्यमातूनच येथील कारखानदारीला बळ मिळू शकते याची आम्हाला पूर्णपणे जाणीव आहे. त्यामुळे आगामी काळात महाविकास आघाडीच्या पाठीशी कामगार खंबीरपणे उभे राहणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

# महायुतीची डोकेदुखी रिपाइं वाढणार!

## खासदार रामदास आठवले यांच्याकडून रिपाइं पदाधिकाऱ्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न

**पुणे | प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीच्या मतदानासाठी अवघे काही दिवस शिल्लक राहिले आहेत. निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात आला असून सर्वच राजकीय पक्षांचे वरिष्ठ नेते प्रचारात सहभागी होत एकमेकांवर टीकेची झोड उठवत आहेत. पुण्यात महायुतीत मित्रपक्ष म्हणून सहभागी असलेल्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या काही पदाधिकाऱ्यांनी घेतलेली भूमिका महायुतीला अडचणीची ठरत आहे. 'रिपाइं'च्या पदाधिकाऱ्यांच्या निर्णयामुळे महायुतीची डोकेदुखी वाढणार आहे.



भारतीय जनता पक्षाबरोबर मित्रपक्ष म्हणून महायुतीत समाविष्ट असतानाही 'रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया'च्या (रिपाइं) शहरातील पदाधिकाऱ्यांना सन्मान मिळत नसल्याने 'रिपाइं'च्या गटातील पदाधिकाऱ्यांची नाराजी अद्यापही कायम आहे. भाजपकडून सन्मान मिळत नसल्याने विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीला मतदान न करण्याची शपथ या पदाधिकाऱ्यांनी घेतली आहे. त्यामध्ये कोणताही बदल झालेला नसल्याने महायुतीची डोकेदुखी वाढणार आहे.

मित्रपक्ष असतानाही 'रिपाइं'ला सन्मान मिळत नसल्याचा आरोप करून माजी उपमहापौर डॉ. सिद्धार्थ धेंडे यांच्या नेतृत्वाखाली काही पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी नाराजी व्यक्त केली होती. या निवडणुकीत महायुतीला मतदान न करण्याची शपथ या पदाधिकाऱ्यांनी राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ घेतली आहे. ही नाराजी दूर करण्याचा प्रयत्न केला जाईल, असे महायुतीकडून स्पष्ट करण्यात आले होते. मात्र, अद्यापही ही नाराजी दूर झालेली नाही.

'रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया'चे (आठवले गट) प्रमुख खासदार रामदास आठवले यांनी यामध्ये पुढाकार घेऊन पदाधिकाऱ्यांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्याला यश आले नाही. आठवले यांनी फोनवरून समजूत काढण्याचा प्रयत्न केल्यानंतरही पदाधिकारी मतदान न करण्याच्या निर्धारावर ठाम असल्याने महायुतीसमोरील अडचणींत वाढ होण्याची शक्यता आहे. पक्षाचे नेते आठवले हे केंद्रात मंत्री आहेत. भाजप नेत्यांकडे ते वारंवार रिपाइंला विधानसभा निवडणुकीत किमान १२ जागा द्याव्यात, असे म्हणत होते. पण भाजपने किंवा महायुतीमधील अन्य पक्षांनाही या मागणीकडे लक्ष दिले नाही. जागावाटपात आठवले यांना सामावून घेतले नाही. त्यामुळे विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीला मतदान न करण्याची शपथ घेतल्याचे डॉ. धेंडे यांनी सांगितले.

> “ भाजपला आंबेडकरी विचारांची मते चालतात. मात्र, त्यांना सत्तेत वाटा द्यायचा नाही, हे धोरण योग्य नाही. त्यामुळे महायुतीला मतदान करायचे नाही, हा निर्णय घेतला आहे. त्याला आंबेडकरी चळवळीतील अनेकांचा पाठिंबा मिळाला.
>
> **- डॉ. सिद्धार्थ धेंडे, माजी उपमहापौर.**

# वेताळ टेकडीवर दिसला युरोपियन मधुबाज!

## पुण्यातच नव्हे तर महाराष्ट्रात पहिल्यांदा हा पक्षी पहायला मिळाला असल्याचे जाणकारांनी सांगितले

**पुणे | प्रतिनिधी**

वेताळ टेकडी ही जैवविविधता संपन्न असून, या टेकडीवर नुकतेच दुर्मिळ असा युरोपियन हनी बझर्ड म्हणजे युरोपियन मधुबाज पक्षी आढळून आला आहे. या पक्ष्याचे छायाचित्र देखील टिपले आहे. पक्षी निरीक्षण करताना याची नोंद झाली आहे. पुण्यातच नव्हे तर महाराष्ट्रात पहिल्यांदा हा पक्षी पहायला मिळाला असल्याचे जाणकारांनी सांगितले.



वेताळ टेकडीवर १३० हून अधिक पक्षी पहायला मिळतात. त्यामध्ये आता या मधुबाजची भर पडली आहे. त्यामुळे ही वेताळ टेकडी वाचविणे अत्यंत आवश्यक असल्याचे मत टेकडीप्रेमींनी व्यक्त केले आहे. मधुबाज हा पक्षी युरोपातून स्थलांतर करुन आपल्या देशात आला. त्याचे दर्शन वेताळ टेकडीवर होणे ही एक ऐतिहासिक नोंद ठरणार आहे. हिवाळ्यामध्ये अनेक पक्षी स्थलांतर करतात. परदेशातील अनेक पक्षी आपल्या भारतात येतात आणि प्रामुख्याने शिकारी पक्षी गवताळ प्रदेशात येतात. शिकारी पक्ष्यांमधील 'ओरिएन्टल हनी बझर्ड' म्हणजेच मधुबाज हा पक्षी सर्वसामान्यपणे महाराष्ट्रात आढळतो. पण, याच कुळातील दुर्मीळ युरोपियन हनी बझर्ड मात्र आपल्याकडे दिसत नाही. या पक्ष्याची ही नोंद महाराष्ट्रातील पहिलीच आहे. वन विभाग आणि वेताळ टेकडी बचाव कृती समितीतर्फे नुकतेच बर्ड वॉक झाला. त्यामध्ये पुण्यातील पक्षी निरीक्षिक अनिरुद्ध गोखले,पंकज इनामदार, मयूर आरोळे, शमिक परब, निषाद होमकर यांचा समावेश होता. त्यांनी वेताळ टेकडीवर फिरताना त्यांना या पक्ष्याचे दर्शन झाले. या पक्ष्याचे छायाचित्र टिपल्यानंतर हा नेहमी दिसणारा मधुबाज असू शकतो, असं सर्वांना वाटले. पण आदेश शिवकर यांनी पक्ष्याची खरी ओळख सांगितली.

> “ आपल्याकडे मधुबाज आणि युरोपियन मधुबाजच्या प्रजननातून संकरित झालेल्या पक्ष्यांच्या नोंदी आहेत. पण, पुण्यात दिसलेला युरोपियन मधुबाज हा कोणत्याही संकरमधला नाही. हा पक्षी युरोप आणि मध्य आशियामधून स्थलांतरीत होतो. युरोपियन मधुबाजाच्या पंखाखाली काळ्या रंगाचा गडद पंच दिसतो, जो मधुबाज पक्ष्यामध्ये नसतो. त्याच्या डोळ्याचा रंग पिवळा असून, मधुबाजापेक्षा युरोपियन मधुबाजाचा आकार आणि पंखाचा विस्तार मोठा असतो. युरोपियन मधुबाजाच्या पंखाच्या कडेला आणि शेपटीच्या शेवटाला एकच मोठा पट्टा असतो. मधुबाजामध्ये हे पट्टे संख्येने दोन ते तीन असतात.
>
> **- अनिरुद्ध गोखले, पक्षीनिरीक्षक.**